# जळगाव शहर महानगरपालिका

**ई-वार्तापत्र** **माहे जून २०१६**



## जळगाव महानगरपालिकेच्या नाले साफ सफाईची मोहीम सुरू

जळगाव महानगरपालिकेने प्रभाग क्रं. ०१ ते ०४ मध्ये नाले साफ सफाईच्या माहीमेस दिनांक १६ मे २०१६ पासून सुरूवात केलेली आहे. या वेळी पाऊस जास्त पडणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवलेली आहे. त्या अनुशंगाने महानगरपालिका हददीतील नाल्यांमधील गाळ, कचरा काढणे, अतिक्रमणे काढण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. आजपावेतो ३० टक्के काम पुर्ण झालेले आहे. सदर कामे ३१ मे २०१६ पर्यन्त पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहेत.

**स्वच्छ भारत अभियान**

| | |
|---|---|
| प्राप्त अर्ज | ३४१९ |
| मंजूर अर्ज | ३४१९ |
| बांधकाम पुर्ण | १३१७ |

## जलपुर्न:भरण अभियान




जळगाव महानगरपालिकेत जल पुर्नभरणाठी दिनांक १३ मे २०१६ रोजी अभियान बैठक घेण्यात आलेली होती सदर बैठकीत जळगाव शहरातील प्रमुख खाजगी संस्थांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात आलेले होते. सदर बैठकीत खाजगी सहभागाने जल पुर्नभरणाचे साहीत्य देण्याची तयारी शहरातील संस्थांनी दाखविली. जळगाव महानगरपालिकेने देखील मेहरूण तलावाची खोली वाढवून भूजल स्तरातील पातळी वाढविण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या सहाय्याने खोलीकरण, मजबूतीकरणाची कामे हाती घेतलेली आहेत सदरची कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. तसेच सदर कामे करण्यासाठी खाजगी संस्थांनी निधी उभारण्याची तयारी दर्शविलेली आहे.

## अतिक्रमण मोहीम

जळगाव शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्ते हे अतिक्रमणाच्या विळख्याने पुर्णत: व्यापलेले होते. सदर ठिकाणी नियमित येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांना त्रास सहन करावा लागत होता महानगरपालिकेने या मुख्य बाजार पेठेत अतिक्रमण काढण्यास विरोध होत असला तरी अतिक्रमण विभाग कर्मचारी, उप आयुक्त यांनी विरोधास न मानता अतिक्रमण काढून रस्ता मोकळा केला. रस्ता मोकळा करण्यास आजू बाजूच्या व्यापारी दुकानदारांनी मोठ्या प्रमाणावर सहाकार्याची भुमिका घेतली त्यामुळे ही कार्यवाही यथस्वीरित्या पुर्ण करणे शक्य झाले. अतिक्रमण विभागाच्या झालेल्या कार्यवाहीत एकुण १० हातगाडया, ०२ टपऱ्या व साहीत्य जमा करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाहीस सन्माननीय महानगरपालिका सदस्यांनी सहाकार्य केले व जप्तीचा सामान लवकर न देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हॉकर्स, गाडीवाले यांना शिस्त लावण्यास मदत होत आहे.

## भीषण पाणी टंचाईत देखील नियमित पाणी पुरवठा



जळगाव शहरात मे महिन्यात उन्हाचा पारा हा ४८ डिग्रीवर जावून पोहचला. उन्हाळयात प्रचंड उष्णतेमुळे नागरीकांना पाणी पुरवठा नियमित करणे अत्यंत गरजेचे होते या कालावधीत पाणी पुरवठा विभागाने कुठलाही खंड न पडू देता नियमित पाणी पुरवठा करून, तक्रारींची पुर्तता करून पाणी पुरवठयाची जवाबदारी यथस्वीरीत्या पार पाडलेली आहे.

## अमृत योजनेत तयार होणार हरीत क्षेत्र




जळगाव महानगरपालिकेने सनं ४४८ मोहाडी रोड येथे हरीत क्षेत्राचा विकास करण्याची आखणी केलेली असून या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करून अमृत अभियाना अंतर्गत शासनास सादर करण्यात आलेला आहे. या कामास जवळ पास रू.१२० लक्ष खर्च येणार आहे. यात लहान मुलांसाठी मातीपासून विविध कलाकृती तयार करण्यासाठी स्वतंत्र जागा, मोठयांसाठी स्वतंत्र जा गा असून यात संपुर्ण नैसर्गिक समतोल राखला जाईल अश्या प्रकारची फुल झाडे, फळ झाडे यांची प्रस्तावना करण्यात आलेली आहे. त्यामुळे पक्षांचा अधिवास वाढण्यास मोठया प्रमाणावर मदत होणार आहे. या हरीत क्षेत्राच्या आजूबाजूस वनजमीन आहे.

- जन्म मृत्यू नोंद वेळेवर करणे अनिवार्य आहे -